# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 15/09/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### अज्ञात इसमाचा मृत्यू

दि. 13/09/2021 रोजी पोलिस निरीक्षक श्री राहुल सोनवणे पो. स्टे. केळवद यांना नरेन्द्र डाहाट रा. झिल्पी ता. कळमेश्वर सरपंच झिल्पी–लोहगड यांनी सायंकाळी 06.45 वा. सुमारास माहिती दिली की, मौजा झिल्पी शिवारात बस स्टॅाप कडुन गावाकडे जाणाऱ्या डांबरी रोडच्या काही अंतरावर एक अज्ञात इसम वय अंदाजे 40 ते 45 वर्षाचा हा मृत अवस्थेत मिळुन आला आहे. करीता पो. स्टे. केळवद येथील पोलिस निरीक्षक श्री राहुल सोनवणे व पोलिस स्टाफने घटनास्थळी जावुन पाहिले असता सदर इसमाचे अंगावर गुलाबी रंगाचा शर्ट, पांढऱ्या रंगाची फुल पॅट असुन सदर अनोळखी इसमाच्या नाकातुन व तोंडातुन पांढरट फेस आलेला दिसतो. त्याचे उजव्या हाताच्या बोटात कासव चिन्ह असलेली पांढरट धातुची अंगठी, कंबरेला काळया रंगाचा तुटलेला कमर पटटा तसेच पायात विटकरी रंगाची चप्पल दिसली. सदर ईसमाचा बांधा मजबुत असुन उंची 175 सेमी आहे. सदर अनोळखी इसमास कोणी ओळखत असल्यास पो. स्टे. केळवद येथील खालील मोबाईल क्रमांकावर माहिती द्यावी.

पोलिस निरीक्षक श्री राहुल सोनवणे मो. क्र. 7020577459
सहायक फौजदार अमरदिप कामठे मो. क्र. 9923210344
पो.स्टे. केळवद– 07113–256922 वर कृपया संपर्क साधावा.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर